
खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २०७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१० मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# 'भानुदास एकनाथ' च्या जयघोषाने अवघी पैठणनगरी दुमदुमली !

## नाथ षष्ठीच्या पहिल्या दिवशी पाच लाख भाविकांनी घेतले नाथसमाधीचे दर्शन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९ पैठण (छ.संभाजीनगर) :** येथील शांतीब्रम्ह संत श्री एकनाथ महाराज यांच्या नाथषष्ठी यात्रोत्सव सोहळ्यास सोमवारी मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. लाखो वारकऱ्यांच्या भानुदास एकनाथ च्या जयघोष, टाळ मृदंगाच्या गजराने अवघी पैठणनगरी दुमदुमून गेली आहे.

पहाटे आमदार विलास भुमरे व जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते नाथ समाधी मंदिरात सपत्नीक महापुजा करण्यात आली. यावेळी आमदार विलास भुमरे व जिल्हाधिकारी स्वामी रावळात फुगडी खेळून आनंद घेतला. यावेळी नाथवंशज रघुनाथबुवा गोसावी, उपविभागीय अधिकारी निलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार, न.प. मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे, नगराध्यक्षा विद्या कावसानकर, उपनगराध्यक्ष तुषार पाटील, दुध संघाचे संचालक नंदलाल काळे, नाथसंस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे, उपजिल्हाप्रमुख विनोद बोंबले, नामदेवराव खराद हभप विठ्ठल महाराज चनघटे, शहादेव लोहारे, संतोष गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**• आ.विलास भुमरे व जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते सपत्नीक महापुजा...**

दुपारी नाथांच्या वाड्यातून (आतील नाथ मंदिर) नाथवंशजांच्या नेतृत्वाखाली पहिली दिंडी (निर्याण दिंडी) काढण्यात आली. दिंडीत वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यंदा नाथांच्या दर्शनासाठी पैठण नगरीत वारकऱ्यांचा गर्दीचा महापुर आला आहे.

शहराचे सर्व रस्ते वारकऱ्यांच्या गर्दीने गजबजून गेले असून अवघी पैठणनगरी भक्तीमय झाली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातुन आलेल्या शेकडो दिंड्या सोमवारी नगरप्रदक्षिणा करुन आपल्या विविध ठिकाणी असलेल्या फडावर विसावल्या. नाथषष्ठी सोहळयासाठी शेकडो दिंड्यामधून लाखो वारकरी व भाविक पैठणमध्ये दाखल झाले आहेत. नाथ षष्ठीच्या पहिल्या दिवशी वारकऱ्यांनी पहाटे गोदावरी नदी पात्रात व जायकवाडी धरणात पवित्र स्नान करुन नाथ समाधीचे दर्शन घेतले. दुपारी आतील नाथमंदिरातुन नाथवंशजांच्या नेतृत्वाखाली पहिली दिंडी (निर्यात दिंडी) काढण्यात आली. या दिंडीत अनेक दिंड्या सहभागी झाल्या होत्या. ही दिंडी गावातील नाथमंदिरास प्रदक्षिणा घालुन उदासी मठ मार्गे ही दिंडी गोदा वाळवंटातुन बाहेरील नाथमंदिरातील समाधीचे दर्शन घेऊन परत गावातील नाथमंदिरात आली. परत आल्यानंतर तेथे नाथवंशजाचे भजन व किर्तनाचा कार्यक्रम झाला. नाथषष्ठीच्या दुसऱ्या दिवशी (दि.१०) रोजी सप्तमीला रात्री बारा वाजेच्या सुमारास गावातील नाथमंदिरापासुन नाथांच्या पादुकांची पालखी म्हणजे छबिना पालखी काढण्यात येईल.

# आजपासून पासून नवीन ऑटो रिक्षा परवान्यांना स्थगिती - परिवहन मंत्री

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, मुंबई :** राज्यातील वाढती वाहतूक कोंडी रोखणे व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी आजपासून म्हणजेच ९ मार्चपासून नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्यात येत असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर नवीन परवाने द्यावेत, या संदर्भात निर्णय घेतला जाणार असून, त्यानुसार पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे माहिती मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्रातील ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य शासनाकडे असून शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राज्य शासनाला याबाबत स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्यास सांगितले आहे.

महाराष्ट्राचे परिवहन मंत्री या नात्याने केंद्र शासनाकडे केलेल्या पत्रव्यवहारानंतर केंद्राने कार्यालयीन स्मरणपत्राद्वारे ही माहिती दिली आहे. मोटार वाहन (दुरुस्ती) अधिनियम, २०१९ अंतर्गत राज्य सरकारांना वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक लवचिकता देण्यात आली असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम ६६ (३) नुसार राज्य शासनाला प्रवासी व माल वाहतुकीसंदर्भातील परवाने बदलण्याचा तसेच विविध योजना राबविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी तसेच वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करता येईल, असे केंद्र शासनाने स्पष्ट केले आहे.

यावरोबरच सध्या अस्तित्वात असलेले ऑटो रिक्षा परवाने अनेक




ठिकाणी एकाच घरात देण्यात आलेले आहेत, काही परवाने बांग्लादेशी नागरिकांना अवैध रितीने दिल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. आता पर्यंत राज्यभरात सरसकट १४ लाखांपर्यंत ऑटो रिक्षा परवाने दिलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबतचा विषय स्थानिक परिस्थिती आणि वाहतुकीच्या गरजेनुसार राज्य शासनाने योग्य पद्धतीने हाताळण्याचा सल्ला केंद्र शासनाने दिला आहे.

राज्यातील नागरिकांना अधिक चांगली आणि सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन लवकरच आवश्यक त्या धोरणात्मक निर्णयांवर विचार करणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक सांगितले.

# विंचूरजवळ भीषण अपघात !

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन जिवलग मित्रांचा अंत



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर हनुमाननगर जवळ रविवारी दुपारी झालेल्या एका भीषण अपघातात जळगाव नेऊर (ता. येवला) येथील दोन तरुणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत या दोन जिवलग मित्रांचा अंत झाल्याने संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे.

➤ **नेमकी घटना काय? :** जळगाव नेऊर येथील तुषार विलास घुले (वय २८) आणि आकाश बाळुबा सोनवणे (वय २६) हे दोन मित्र आपल्या दुचाकीवरून (क्रमांक एम.एच १७ आर.५३१८) विंचूरकडून घराकडे परतत होते. रविवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास हनुमाननगर जवळ एका अज्ञात भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दोन्ही तरुण गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले.

➤ **उपचारापूर्वीच मृत्यू :** अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने खाजगी रुग्णवाहिका बोलावून दोघांनाही लासलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्निल पाटील यांनी तपासणीअंती सायंकाळी ५:३० वाजता दोघांनाही मृत घोषित केले.

➤ **पोलिस तपास सुरू :** या घटनेबाबत लासलगाव पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किरण साळुंखे या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, धडक देऊन फरार झालेल्या वाहनाचा शोध घेतला जात आहे.

➤ **गावावर शोककळा :** दोन तरुण मुलांचा असा अचानक मृत्यू झाल्याने जळगाव नेऊर गावात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. रविवारी रात्री ८ वाजता शोकाकुल वातावरणात दोघांवरही अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विदर्भस्तरीय आ.श्री बॉडीबिल्डिंग स्पर्धेत योगेश शेंडे ठरला 'आ.श्री २०२६' चा मानकरी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** आ. किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून आणि श्री माता महाकाली क्रीडा महोत्सव २०२६ अंतर्गत सलग पाचव्या वर्षी आयोजित करण्यात आलेली विदर्भस्तरीय आमदार श्री बॉडीबिल्डिंग स्पर्धा २०२६ रविवारी सायंकाळी मनपा पटांगण, गांधी चौक येथे उत्साहात पार पडली.

विदर्भातील विविध जिल्ह्यांतील १२३ नामांकित बॉडीबिल्डर्सनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून आपल्या दम दार शरीरसौष्ठवाचे प्रदर्शन केले. पार पडलेल्या या स्पर्धेत नागपूरचा योगेश शेंडे यांनी आमदार श्री २०२६ हा किताब पटकावला. रोख रक्कम व शिल्ड देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेचे आयोजन चंद्रपूर बॉडीबिल्डर्स अँड फिटनेस असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आले होते. स्पर्धेला क्रीडाप्रेमींची मोठी उपस्थिती लाभली.

यावेळी मुंबईचे सुप्रसिद्ध बॉडीबिल्डर हरमीत सिंह यांची उपस्थिती हे स्पर्धेचे विशेष आकर्षण ठरले. त्यांना पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, क्रीडा क्षेत्र



हे तरुणाईला योग्य दिशा देणारे आणि निरोगी समाज घडविणारे प्रभावी माध्यम आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात तरुणांनी शरीरसौष्ठव आणि फिटनेसकडे वळणे अत्यंत गरजेचे आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील युवकांमध्ये क्रीडाप्रती आवड निर्माण व्हावी आणि त्यांना आपली प्रतिभा दाखविण्यासाठी व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने श्री माता महाकाली क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. अशा स्पर्धांमुळे तरुणांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि सकारात्मकता निर्माण होते, असेही त्यांनी सांगितले.

स्पर्धेत विविध वजनगटांनुसार खेळाडूंनी सहभाग घेतला. त्यामध्ये ५५ किलो गटात भंडारा जिल्ह्यातील आयुष बेंद्रे, ६० किलो गटात नागपूर येथील राहुल बागडे, ६५ किलो गटात नागपूर येथील गिरीराज काळे, ७० किलो गटात अकोल्यातील शेख सलीम शेख कलीम, ७५ किलो गटात नागपूर येथील श्रावण बावणे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर ओपन गटात नागपूर येथील योगेश शेंडे विजयी ठरले.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट किताब असलेला आमदार श्री २०२६ हा मान योगेश शेंडे यांनी पटकावला. याशिवाय बेस्ट पोझर हा किताब नागपूर येथील गिरीराज काळे यांना, तर बेस्ट इम्प्रुव्हमेंट पुरस्कार नागपूर येथील राहुल बागडे यांना प्रदान करण्यात आला.

स्पर्धेचे पंच म्हणून अविनाश लोखंडे, अभिषेक कारिंगवर, राजू कोतेवार, विशाल शिंदे, प्रीतम पाटील, टिकू शिंदे, नितीन गावंडे, किशोर आदमने यांनी पंच म्हणून जबाबदारी पार पाडली याशिवाय विवेक बुरडकर, नकुल वासमवार आणि सुभाष लांजेकर यांनी विशेष सहकार्य केले.

# रुग्णालयात आढळले बुरशीजन्य औषध !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, मुंबई :** ठाणे जिल्ह्याच्या वांगणी येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये बुरशी लागलेली औषधे आढळल्याप्रकरणी खरेदीशी संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करुन दोषी आढळल्यास त्यांचे निलंबन करण्यात येईल, असे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत सांगितले. सदस्य मोहन मते यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य किसन कथोरे यांनी सहभाग घेतला.

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, वांगणी येथील रुग्णालयातील औषधांची खरेदी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून स्थानिक अधिकाऱ्यांनी केलेली आहे. १५ डिसेंबर २५ रोजी येथील औषधांचे नमुने घेण्यात येऊन शासकीय प्रयोगशाळांमधून त्याची तपासणी करण्यात आली. या औषधांमध्ये बुरशीजन्य संक्रमण आढळून आले नाही. तथापि इतर निकषांनुसार अन्न व औषध प्रशासन विभागाच्या यंत्रणेने सदर औषध अप्रमाणित असल्याचे घोषित केले आहे. या प्रकरणी औषधांना योग्य ठरविलेल्या प्रयोगशाळेला काळ्या यादीत टाकण्यात येईल. त्याचप्रमाणे खरेदीशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करुन दोषी आढळल्यास निलंबन करण्यात येईल. यापुढे असे प्रकार घडू नयेत आणि गुणवत्तापूर्ण औषधे खरेदी केली जावीत यासाठी लवकरच ड्रग डिटेक्शन मशीनचा उपयोग केला जाईल असे त्यांनी सांगितले.

# भारताने इतिहास डिफिट आणि रिपिट केला



९ मार्च २०२६ ही तारीख भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे कारण या दिवशी टी २० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्युझीलंड संघावर ९६ धावांनी विजय मिळवत टी २० विश्वचषकावर तिसऱ्यांदा भारताचे नाव कोरून इतिहास रचला. या विश्व विजयासोबतच भारताने अनेक विक्रम आपल्या नावे केला. या विजयासोबत भारत तिसऱ्यांदा टी २० चा विश्व विजेता संघ तर बनलाच शिवाय सलग दुसऱ्यांदा आणि घरच्या मैदानावर टी २० विश्वचषक जिंकणारा पहिला संघही ठरला याचाच अर्थ भारताने इतिहास डिफिट आणि रिपिटही केला. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी मी माझ्या 'इंडिया इतिहास डिफिट करणार आणि रिपिटही करणार' या माझ्या लेखात तसे भाकीत वर्तवले होते ते आज खरे ठरले. अर्थात यामागे कोणतेही ज्योतिष किंवा भविष्य नसून भारतीय खेळाडूंचा फॉर्म आणि गुणवत्ता पाहूनच मी तो लेख लिहिला होता. यावेळची टी २० विश्वचषक स्पर्धा भारत आणि श्रीलंका या देशात खेळली गेली. या विश्वचषक स्पर्धेत भारत सुरुवातीपासूनच भारत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार होता. काहीही करून यावेळी संघाला विश्व विजयी करायचेच अशी खूणगाठ कर्णधार सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी बांधली होती. टी २० विश्वचषक स्पर्धेसाठी कोणते खेळाडू हवेत याचा पक्का विचार करून सूर्यकुमार यादवने त्याला हवे ते खेळाडू संघात घेतले. टी २० स्पर्धेत अष्टपैलू खेळाडूंचे महत्व ओळखून त्याने संघात हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल यांचा संघात समावेश केला. वरुण चक्रवर्ती आणि वॉशिंगस्ट सुंदर यांचा समावेश संघात केला तर जगातील सर्वात घातक वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा, अर्शदीप सिंग मोहम्मद सिराज यांचा संघात समावेश करण्यात आला होता. भारताची गोलंदाजी या स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाजी ठरली. ज्या ज्या वेळी सामना भारताच्या हातातून निसटला असे वाटत होते त्या त्या वेळी गोलंदाजांनी संघाला विजय मिळवून दिला. अंतिम फेरीतही भारताच्या सर्व गोलंदाजांनी घातक गोलंदाजी केली. जसप्रीत बुमराने संपूर्ण स्पर्धेत जशी घातक गोलंदाजी केली तशीच घातक गोलंदाजी अंतिम सामन्यात करून ४ प्रमुख फलंदाजांना बाद केले आणि न्यूझीलंडच्या फळा फलंदाजीचा कणा मोडत भारताच्या विजयाचा मार्ग सुकर केला. केवळ बुमरानेच नाही तर सर्वच गोलंदाजांनी अप्रतिम गोलंदाजी करून न्यूझीलंडच्या फलंदाजांना जेरीस आणले आणि भारताला ९६ धावांनी एकतर्फी विजय मिळवून दिला. जसप्रीत बुमराने त्याच्या घातक गोलंदाजीने अंतिम सामन्यातील सामनावीर हा किताब मिळवला. संपूर्ण क्रिकेट विश्वाचे लक्ष लागलेल्या या अंतिम सामन्यात न्यूझीलंडने भारताला प्रथम फलंदाजीसाठी निमंत्रित केले. भारताने मिळालेल्या या संधीचा पुरेपूर फायदा उचलत धमाकेदार सुरुवात केली. भारताचे सलामीवीर संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांनी भारताला धडाकेबाज सुरुवात करून विश्व विजयाचा पाया रचला. त्यांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले. अभिषेक शर्माने अर्धशतक झळकावले. या स्पर्धेत त्याला त्याच्या लौकिकाप्रमाणे फलंदाजी करता आली नाही मात्र अंतिम सामन्यात त्याने ती कसर भरून काढली. संजू सॅमसनसाठी तर ही स्पर्धा अविस्मरणीय ठरली. सुरवातीच्या काही सामन्यात त्याला संघाबाहेर बसावे लागले पण जेव्हा त्याला संधी मिळाली तेव्हा त्याने या संधीचे सोने केले. वेस्ट इंडिज, इंग्लंड यांच्या विरुद्ध त्याने जशी स्फोटक फलंदाजी केली तशीच अंतिम सामन्यातही करून संघाला पुन्हा एकदा अडीचशेचा टप्पा ओलांडून दिला आणि भारताचा विजय पक्का केला. त्याने संपूर्ण स्पर्धेत तीनशेपेक्षा अधिक धावा काढत मालिकावीर हा किताब मिळवला. भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत फलंदाजी आणि गोलंदाजीत अप्रतिम कामगिरी केली . या स्पर्धेत भारताचे क्षेत्ररक्षणही अप्रतिम होते. एकूणच गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर भारताने अप्रतिम कामगिरी करीत हे विश्व विजेतेपद मिळवले. सूर्यकुमार यादवने संघाचे कर्णधारपद अतिशय कुशलतेने सांभाळले. या विजतेपदात जितका खेळाडूंचा वाटा आहे तितकाच सपोर्ट स्टाफचाही आहे. प्रशिक्षक गौतम गंभीर आणि त्यांच्या टीमने पडद्यामागे मोठी कामगिरी बजावली त्यामुळेच भारत पुन्हा एकदा आयसीसीच्या स्पर्धेत विजेता बनला. भारतीय संघाचे हे विजेतेपद खास आहे कारण भारतीय संघाचे हे तिसरे टी २० चे विश्व विजेतेपद आहे. २००७ साली भारताने पाकिस्तानला हरवत पहिल्यांदा विजेतेपद मिळवले होते. तेंव्हा भारताचा कर्णधार महेंद्रसिंग धोनी हा होता . त्यानंतर २०२४ साली रोहित शर्मा कर्णधार असताना भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून दुसऱ्यांदा टी २० विश्वचषक जिंकला. त्यानंतर आता म्हणजे २०२६ साली भारतीय संघाने या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. तीनदा टी २० विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला देश आहे. त्यामुळेच भारतासाठी हे विजेतेपद ऐतिहासिक आहे. तीनदा टी २० विश्वचषक जिंकून भारताने आम्हीच टी २० चे चॅम्पियन आहोत हे जगाला दाखवून दिले. हे विजेतेपद मिळवून भारतीय संघाने क्रिकेट विश्वावर आपली मक्तेदारी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. कारण आयसीसीच्या सलग चार स्पर्धेत भारताने अंतिम फेरी गाठली त्यात भारताला तीनदा विजेतेपद मिळवण्यात यश मिळाले. फक्त एकदाच भारताला अंतिम फेरीत पराभव स्वीकारावा लागला तो २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया कडून मात्र त्यानंतर मागील म्हणजे २०२४ च्या टी २० विश्वचषक स्पर्धेत भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून विश्व विजेतेपद मिळवले त्यानंतर मागीलवर्षी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. आता हे विश्व विजेतेपद मिळवून भारताने क्रिकेट विश्वातील आपली मक्तेदारी सिद्ध करून आपणच क्रिकेट मधील सर्वोत्तम संघ आहोत हे जगाला दाखवून दिले आहे. तिसऱ्यांदा टी २० विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद मिळवून इतिहास रचणाऱ्या भारतीय संघाचे हार्दिक हार्दिक अभिनंदन!

**– श्याम ठाणेदार**

# भारतीय क्रिकेटचे अनमोल रत्न.. संजू सॅमसन

टीम इंडियाला २०२६च्या टी २० विश्वचषकात आश्वासक फलंदाजीसाठी एक खणखणीत सुवर्णमुद्रा सापडली ती केरळचा धडाकेबाज फलंदाज संजू सॅमसन याच्या रूपाने. संजूने अपयशातून स्वतःला सावरत या विश्वचषक स्पर्धेत धावांचा धडाका तर लावलाच पण स्वतःची शानदार वैयक्तिक कामगिरी साकारताना त्याने संघाला आधी सुपर ८ मध्ये आणि नंतर अंतिम फेरीत पोहोचवण्याचे काम केले. केरळच्या मल्याळम भाषेत कुटुंबाची अथवा समाजाची धुरा जबाबदारीने वाहणाऱ्या व्यक्तीला 'चेता' म्हणजेच मोठा भाऊ म्हणून आदराने संबोधले जाते. संजू सॅमसनने सलामीला येत संघासाठी धावांचा रतीब टाकत मोठ्या भावाचीच जबाबदारी पार पाडली. त्याने बाद फेरीच्या प्रत्येक लढतीत टीम इंडियाच्या विजयाचा पाया आपल्या खणखणीत खेळींनी मजबूत केला आणि त्यानंतर अक्षर पटेल, हार्दिक पांड्या, ईशान किशन, जसप्रीत बुमराह आणि वरुण चक्रवर्ती यांनी त्यावर विजयाचा कळस चढवला. त्याच्या या परक्रमामुळेच तो तिसऱ्यांदा टी २० विश्वचषक जिंकणाऱ्या टीम इंडियासाठी 'चेता' मोठा भाऊच ठरलाय असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

संजूने स्वतःचे सर्वस्व आपल्या प्रत्येक खेळीत अक्षरशः ओतले. त्यामुळेच यजमान भारतीय संघाला शानदार विजयासाठी भक्कम पाया लाभला हे विसरून चालणार नाही. संजू आणि महिलांचा आयसीसी विश्वचषक २०२५ देशाला मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलणारी जेमिमा रोड्रिगेज यांच्या विश्वविजेतेपदाच्या वाटचालीत आपल्याला बरेच साम्य आढळते. जेमिमाही २०२५ महिला विश्वचषकाच्या आरंभास अपयशाच्या गर्तेत होती. पण महान खेळाडू कधीही अपयश झुगारून चमकदार कामगिरी करू शकतो हे सिद्ध करीत जेमिमाने नंतर शानदार खेळी करीत महिला टीम इंडियाला पहिला विश्वचषक मिळवून देण्याची जिगर दाखवली. संजू सॅमसनची या टी २० विश्वचषकातील कामगिरी तशीच झालीय. दोघेही परमेश्वरावर म्हणजेच 'प्रभू'वर नितान्त श्रद्धा ठेवणारे त्यामुळेच या दोघांतही विलक्षण



साम्य आहे. एक केरळचा तर दुसरी मुंबईची. पण मातृभूमीसाठी खेळताना या दोघांनीही केलेला पराक्रम भारतीय क्रिकेटशौकीन कधीच विसरू




शकणार नाहीत. केरळने भारतीय क्रिकेटला एस श्रीसंत, जवागल श्रीनाथ, टिनू योहानन अशी नररत्ने दिलीत त्यात आता संजू सॅमसन या नव्या रत्नाचा समावेश झालाय. त्याने तगड्या वेस्ट इंडिज आणि त्यानंतर इंग्लंडविरुद्ध तुफानी खेळी साकारली. शिवाय अंतिम फेरीत कानात 'विजयाचे वारे' शिरलेल्या न्यूझीलंड संघाविरुद्ध ज्या तुफानी खेळी साकारल्या

त्याला तोड नाहीच. संजूने वेस्ट इंडिजविरुद्ध नाबाद ९७तर इंग्लंडविरुद्ध उपांत्य लढतीत ८९ धावा फटकावत टीम इंडियाला पुन्हा विश्वविजेतेपदाच्या द्वारावर नेले. न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम लढतीतही संजूच्या यशाचा हा आलेख चढताच राहिला त्याने ८ मार्च २०२६ रोजी अहमदाबाद येथे न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात, सॅमसनने ४५ चेंडूत ८९ धावा फटकावल्या आणि टी२० विश्वचषक अंतिम सामन्यात सर्वाधिक वैयक्तिक धावसंख्या नोदवली. अंतिम सामन्यापर्यंत, तो स्पर्धेतील धावा करणाऱ्यांच्या यादीत आघाडीवर राहिला. त्याच्या फटक्यात नेहमीच विलक्षण आत्मविश्वास टी २० विश्वचषकातील बाद फेरीच्या प्रत्येक लढतीत दिसला. उपांत्य लढतींपर्यंत एका बाजूने सलामीवीर अभिषेक शर्मा अपयशी ठरत असताना संजूने मात्र आत्मविश्वास न गमावता संघासाठी सतत धावांचा रतीब टाकला. त्यामुळेच सुपर ८ आणि बाद फेरीच्या लढतींत सॅमसन टीम इंडियाचा 'तारणहार' ठरला. त्याची या विश्वचषकातील शानदार कामगिरी आणि यश डोक्यात न जाऊ देता शांतपणे संघासाठी झुजण्याची त्याची वृत्ती पाहता संजू 'दि गॉड गिफ्ट' असे म्हणण्याचा मोह देशातील प्रत्येक क्रिकेटशौकीनाला होणे स्वाभाविक आहे. टीम इंडियाच्या या चेता' संजूचे कौतुक करावे तेव्हढे थोडे आहे. केरळचा संजू टीम इंडियाला तिसऱ्यांदा टी २० विश्वचषक मिळवून देणारा 'भारतवीर' ठरलाय यात शंका नाही.

आता या 'चेता' संजुला भविष्यात सांभाळणे हि आपल्या क्रिकेट बोर्डाची मोठी जबाबदारी आहे. भारतीय संघ टी २० विश्वचषकाचे तिसरे विश्वविजेतेपद पटकावत असतानाच यंदा तब्बल ६७ वर्षांनी काही काळ किरकोळ म्हणून गणल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीर संघाने रणजी क्रिकेटचे राष्ट्रीय विजेतेपद पटकावले आहे. खऱ्या अर्थाने क्रिकेट हा भारतीयाच्या रक्तातला खेळ बनलाय. संजू हा या राष्ट्रीय साखळीतील एक 'अनमोल रत्न' बनलाय याचा आनंद केवळ केअरलवासीयांनाच नव्हे तर तमाम १३० कोटी भारतीयाना नक्कीच वाटत राहणार आहे.

**आपल्या या 'चेता' संजूला भविष्यात उदंड असे यश मिळो आणि टीम इंडियासाठी त्याच्याकडून उज्वल अशी कामगिरी होवो या शुभेच्छा आपण देऊ या... !!**

## सावित्रीमाई

क्रांती सूर्य अर्धांगी
ते पतिव्रता जीवन
समाज हाच संसार
फुले खरे नंदनवन

देती एकमेकांसाथ
वेचून तन मन धन
पत्नीपती कसे हवे
सर्वोत्तम उदाहरण

बंद करी क्रूर प्रथा
विधवांचेकेशवपन
झगडे पुरी कराया
समाजोध्दार सपन

सत्यशोधकसमाज
खरेसमाज प्रबोधन
जन सेवा ईश सेवा
कमवले हेचि धन

शाळा सुरू करता
सोसले कसे घर्षण
सक्षमआज महिला
तेंव्हा दिले शिक्षण

विधवाअबला मुली
चाललेले ते शोषण
शिक्षण दीप उजळे
होई जीवन रोषण

गगनी तारे जितके
तितके तुमचे सगुण
प्रश्न अनुत्तरित राही
कसे फेडावे हे ऋण

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# हिरवाचुडा घालून ६० वर्षांच्या आमिर खानच्या गर्लफ्रेंड चा सिंपल लुक

बॉलिवूड अभिनेता आमिर खानची गर्लफ्रेंड गौरीचा साधा आणि मनमोहक लूक नेहमीच सर्वांचे लक्ष वेधून घेतो. नुकतेच या दोघांना मोचक नाहटा आणि दीक्षिता खुल्लर यांच्या प्री-वेडिंग रिसेप्शनमध्ये एकत्र पाहायला मिळाले, जिथे दोघांनीही उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. गौरीच्या साध्या परंतु स्टायलिश लूकने कार्यक्रमात एक वेगळाच ठसा उमटवला. आमिर खानसोबत तिच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमात आणखी शोभा वाढली.

या प्रसंगी गौरीने ग्रीन रंगाची साडी परिधान केली होती,ज्यावर सिल्वर रंगाची सूक्ष्म नक्षी आखणी करण्यात आली होती. तिचा हा साधा आणि युनिक लुक नेहमीप्रमाणेच फोटोग्राफर्स आणि चाहत्यांच्या लक्षात राहिला. अशा कार्यक्रमांमध्ये दोघांची जोडी नेहमीच चर्चेत राहते, आणि गौरीचा हा स्टायलिश परंतु साधा लूक तिचे मुख्य आकर्षण ठरला.

**ग्रीन साडीतील गौरीचा साधा लुक !**

बॉलिवूड अभिनेता आमिर खानची गर्लफ्रेंड Gauri Spratt नेहमीच तिच्या साध्या पण स्टायलिश लूकसाठी ओळखली जाते. नुकतेच मोचक नाहटा आणि दीक्षिता खुल्लर



यांच्या प्री-वेडिंग रिसेप्शनमध्ये तिने ग्रीन रंगाची साडी परिधान केली होती. या साडीवर सिल्वर रंगाची बारिक नक्षी केली होती, ज्यामुळे तिचा लूक अधिकच खास आणि युनिक दिसत होता. या साडीवर मॅचिंग बांगड्या तिने कॅरी केल्या होता.



**ग्रीन साडीमध्ये गौरीचा मेकअप**

अतिशय नाजूक आणि नॅचरल मेकअप होता. तिने नैसर्गिक आणि हलक्या रंगाचे फाउंडेशन वापरले होते, ज्यामुळे तिचा चेहरा उजळसर आणि ताजेतवाने दिसत होता. डोळ्यांसाठी हलका स्मोकी आयशॅडो आणि सिल्वर टोनच्या हायलायटचा वापर तिच्या लूकला स्टायलिश टच देत होता. फार काही न करता तिने हा लुक पूर्ण केला.

**गौरीचा सिंपल ब्लाऊज स्टाईल**

या ग्रीन साडीवर तिने साधा आणि क्लासिक ब्लाऊज कॅरी केला. साध्या कट आणि फिटिंगमुळे तिचा ब्लाऊज संपूर्ण साडीशी उत्तम प्रकारे जुळला आणि गौरीच्या साध्या पण मोहक अंदाजाला अधोरेखित केले. हा सिंपल ब्लाऊज तिचा लुक पूर्ण करत होता.

**ग्रीन रंगाच्या साडीवर हिरवाचुडा**

गौरीने ग्रीन रंगाच्या साडीसोबत हिरवाचुडा घालून तिचा लूक पूर्ण केला होता. साध्या पण स्टायलिश या हिरवाचुड्यामुळे तिच्या पारंपारिक साडीच्या अंदाजात एक खास आकर्षक टच आला होता. एक ॲक्सेसरीने हलका आणि सूक्ष्म वापर तिच्या संपूर्ण लूकला अधिक एलिगंट आणि युनिक बनवत होता.

**असा होता आमिर खानचा लुक**

या प्रसंगी आमिरचा लूक क्लासिक आणि स्टायलिश होता. यावेळी त्यांने ब्लॅक सूट कॅरी केला होता. यावेळी त्याने साधा पण आकर्षक ड्रेस निवडला होता यामुळे त्याने कार्यक्रमात उपस्थितांचे लक्ष त्वरित वेधले. आमिरच्या या स्टायलिश आणि एलिगंट लूकने गौरीच्या ग्रीन साडीतील स्टाइलशी मिळून कार्यक्रमाला आणखी उत्साही आणि ग्लॅमरस बनवले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## उदगीर पंचायत समिती सभापतीपदी वनमाला मरलापल्ले तर उपसभापतीपदी बापुसाहेब भोसले यांची बिनविरोध निवड



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०९, उदगीर (लातूर) :** उदगीर पंचायत समिती सभापती व उपसभापती पदासाठी सोमवारी झालेल्या विशेष बैठकीत वनमाला मरलापल्ले यांची सभापतीपदी तर बापुसाहेब भोसले यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवड प्रक्रियेदरम्यान कोणतीही प्रतिस्पर्धी उमेदवारी दाखल न झाल्याने दोन्ही पदांवर बिनविरोध निवड झाल्याचे पिठासीन अधिकाऱ्यांनी जाहीर केले.

जिल्हाधिकारी लातूर यांच्या आदेशानुसार पंचायत समिती येथे सभापती व उपसभापती पदांच्या निवडीसाठी विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा पंचायत समितीच्या उदगीर येथील समागृहात पार पडली. पंचायत समितीच्या एकूण १४ सदस्यांपैकी ११ सदस्य या बैठकीस उपस्थित होते.

सभापती पदासाठी वनमाला मरलापल्ले यांचा तर उपसभापती पदासाठी बापुसाहेब भोसले यांचा प्रत्येकी एकच उमेदवारी अर्ज दाखल झाला होता. उमेदवारी अर्जांची छाननी आणि माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर इतर कोणताही अर्ज दाखल नसल्याने दोन्ही पदांवर बिनविरोध निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे यांनी जाहीर केले.

निवड जाहीर होताच उपस्थित सदस्यांनी टाळ्यांच्या गजरात नव्याने निवडून आलेल्या सभापती व उपसभापती यांचे स्वागत केले. पंचायत समितीच्या विकासकामांना गती देण्याचा तसेच ग्रामीण भागातील विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व सदस्यांच्या सहकार्याने काम करण्याचा विश्वास नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

या सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे यांनी काम पाहिले, तर सचिव म्हणून गट विकास अधिकारी एन.एस.मेडेवार यांनी कामकाज पाहिले तर उपसभापती पदांची निवड बिनविरोध झाली. आगामी काळात पंचायत समितीच्या माध्यमातून विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महिला दिनाचा उत्सव, ७५०० महिलांचा धमाकेदार सहल व मेळावा



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, पडले (ठाणे) :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ठाण्यातील बी. के. वॉटरपार्क येथे आयोजित महिलांच्या विशेष सहल व मेळाव्याला जबरदस्त प्रतिसाद मिळाला. बी.के फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात प्रभागातील ७५०० महिला भगिनींनी भाग घेतला. महिलांसाठी दिवसभर विविध मनोरंजनात्मक उपक्रम, वॉटरपार्कमधील आकर्षक राईड्स, नाश्ता, जेवण आणि चहाची व्यवस्था करण्यात आली होती. या सहलीमुळे महिलांना दैनंदिन कामकाजातून थोडा विरंगुळा मिळाला आणि सर्वांनी मोठ्या उत्साहात हा दिवस साजरा केला.या मेळाव्याला नगरसेविका अर्चना पाटील आणि नगरसेविका वेदिका पाटील यांनी मार्गदर्शन केले. समाजातील महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांना आनंदाचे क्षण देण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम पुढेही आयोजित करण्यात येतील, असा विश्वास ठाणे महानगरपालिकेचे नगरसेवक बाबाजी बाळाराम पाटील यांनी व्यक्त केला.

## पाटणमध्ये डॉल्बीच्या ठेक्यावर रंगपंचमी धूमधडाक्यात !



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०८, पाटण :** सकाळी सात वाजल्यापासून रंगाच्या दुकानातून आपल्या आवडीचे रंग घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची व लहान मुलांची गर्दी झाली होती. पाटण शहरात ठिकठिकाणी रंगाची विक्री करण्यासाठी स्टॉल लागले होते. स्टॉलवर विविध रंग विक्री साठी ठेवले होते, रंगाच्या दुकानात लहान चिमुकली व नागरिक रंग खरेदी करताना दिसत होते. लहान मुलांनी विविध प्रकारच्या पिचकारया रंग उडवण्यासाठी घेताना दिसत होते. काही मुलांनी रंगाचे स्प्रे मोठ्या प्रमाणात वापरताना दिसत होते. लहान मुले आबाल उद्यापासून एकमेकांच्या अंगावर रंग टाकून रंगाची उधळण करत होते. तर पाटण शहरातील प्रत्येक मंडळाने स्पीकर बॉक्स व डॉल्बीच्या ठेक्यावर पाटणच्या मुख्य बाजारपेठेत रंगाची उधळण करत व नाचत मिरवणूका कार्यकर्त्यांनी काढल्या. पाटणच्या मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यावर विविध रंगाचा अक्षरश खच पडला होता. तर विविध प्रकारचे बँलर मध्ये रंग बनवून लहान मुलापासून ते आबालुद्धापर्यंत एकामेकाच्या अंगावर रंग टाकून रंगाची उधळण करताना दिसत होते. पाटण शहरात गल्लीबोळात मोठ्या प्रमाणात एकमेकांच्या अंगावर रंग उडवताना नागरिक दिसत होते. यामध्ये महिला वर्गाचा ही मोठ्या प्रमाणात सहभाग दिसत होता. रंगाची उधळण करताना नैसर्गिक रंगाची उधळण करताना नागरिक दिसत होते.

चौकट

ह्यावर्षी पाटणमध्ये रंगपंचमीला वेगळाच रंग डॉल्बीच्या ठेक्यावर दणदणाट करत तरुणाई थिरकली होती अगदी गणपतीच्या मिरवणुका प्रमाणे पाटणच्या मुख्य बाजारपेठेत डॉल्बीवर दणदणाट करत होते. अनेक डॉल्बी एकमेकांना क्रॉस होताना डॉल्बीतले कार्यकर्ते एकमेकाकडे बघून रंगाची उधळण मोठ्या प्रमाणात करत होते.बघणाऱ्या नागरिकांचा काळजाचा ठोका चुकत होता.

## महिला दिनाचे औचित्य साधून आ.महेंद्र थोरवे यांच्या तर्फे मॅरेथॉन चे आयोजन




**अक्षराज : स्वप्नील देशमूख**

**दि.०९, कर्जत (रायगड) :** महिलांच्या शिक्षण आणि सशक्तीकरणासाठी एक महत्त्वाचा उपक्रम ठरलेल्या 'कन्याथॉन २०२६' या विशेष मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन आणि विजयभूमी युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. रविवार, ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ६:०० वाजता शिवतीर्थ, पोसरी, कर्जत येथे कर्जत-खालापूर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार महेंद्र थोरवे यांच्या शुभहस्ते व अनिल भट्ट चीफ ऑफ पीटीआय जम्मू काश्मीर व यादवेंदर सिंग (आंतरराष्ट्रीय बास्केट बॉल प्लेयर) यांच्या उपस्थित या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

या स्पर्धेचे हे पाचवे वर्ष असून, "Run For Her' या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम महिलांच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवण्यासाठी आयोजित करण्यात आला. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी ही स्पर्धा अतिशय प्रभावी ठरली. यंदा या स्पर्धेत तब्बल ३००० विद्यार्थी आणि नागरिकांनी सहभाग नोंदवला, ही बाब उत्साहवर्धक आहे.

स्पर्धेच्या विविध गटांमध्ये हजारो स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. १० किमी, ५ किमी आणि ३ किमी मॅरेथॉन शर्यतींसह ३ किमी फन वॉक आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमात तरुणांसह विविध वयोगटातील महिलांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. महिलांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य उत्तम राहावे, त्यांना नवीन संधी मिळाव्यात आणि समाजात त्यांची भूमिका अधिक मजबूत व्हावी, हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संजय पडोदे संस्थापक विजय भूमी यूनिवर्सिटी, रविकेश श्रीवास्तव (VC, विजयभूमी विद्यापीठ), राजू पुजारी (CIO, विजयभूमी विद्यापीठ), आणि ॲड. प्रियांका ओझा (संस्थापक व CEO, ॲथलेन), प्रसाद थोरवे यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती.

तसेच, ४०+५०+ क्रिकेट संघटना कर्जत, शिवशंभो युवा हायकर्स कर्जत, दहिवली गाव परिसर विचारमंच, साईनगर गृहनिर्माण संस्था, दहिवली वरील संस्थांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला.

## स्वसंरक्षण प्रशिक्षण महिला सबलीकरणासाठी उपयुक्त : आबासाहेब हुलगे



**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.०९, दापोली (रत्नागिरी) :** महिलांना न्याय व हक्क मिळवून देत असताना कृतीची जोड मिळावी यासाठी महिलांना सक्षम होण्याकरिता शासनामार्फत स्वसंरक्षण प्रशिक्षण दिले जात आहे. यातून महिलांचे सबलीकरण होण्यासाठी मदत होईल' असे प्रतिपादन हायस्कूलचे मुख्याध्यापक आबासाहेब हुलगे यांनी जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमात केले.

मंडणगड येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे जागतिक महिला दिनानिमित्त प्रमुख पाहुणे तायक्कांडो राष्ट्रीय पंच व प्रशिक्षिका काजल लोखंडे, विश्वदास लोखंडे, अड. तेजकुमार लोखंडे, उपप्राचार्य अर्जुन हुल्लोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत मुलींना स्वसंरक्षण प्रशिक्षण देऊन साजरा करण्यात आला यावेळी आबासाहेब हुलगे बोलत होते. यांनी विद्यालयातून शिकणाऱ्या मुलींनी जिजामाता व सावित्रीबाई फुले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शिक्षण घेतले पाहिजे मिळालेल्या स्वातंत्र्याचा योग्य वापर करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

तायक्कांडो प्रशिक्षक काजल लोखंडे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थिनी समोर आपल्या सहकाऱ्यांसह स्वसंरक्षणाची प्रात्यक्षिक करून दाखवली तसेच मुलींना महिला व बाल विकास प्रकल्प जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्यामार्फत देण्यात येणारे स्वसंरक्षण प्रशिक्षण दिले.

कार्यक्रमाला पर्यवेक्षक शांताराम बैकर, सीनियर शिक्षिका विद्या आटपाटकर, राजकुमार सूर्यवंशी, प्रमोद जाधव, क्रीडा शिक्षक गौतम माने सर्व महिला शिक्षिका व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाईंदर येथे ग्रामीण महिला नेतृत्वाला मिळाली नवी दिशा



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०९, मीरा-भाईंदर :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आणि भारताच्या पहिल्या महिला आमदार श्रीमती मुथुलक्ष्मी रेड्डी यांच्या विधानसभेतील सदस्यत्वाच्या शताब्दी वर्षानिमित्त, उत्तन येथील रामभाऊ महालगी प्रबोधिनी येथे दोन दिवसीय 'विकासित भारत नारी शक्ती संगम - ग्रामीण महिला नेतृत्व परिषद २०२६' भव्यदिव्य पद्धतीने आयोजित करण्यात आली होती.

रामभाऊ महालगी प्रबोधिनी आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनो उन्नती अभियान यांच्या सहकार्याने ही विशेष परिषद आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. आपल्या भाषणात ते म्हणाले की नेतृत्व जन्मतः दिले जात नाही, तर ते विकसित करावे लागते. महिलांना योग्य संधी मिळाली तर त्या सर्वोत्तम नेतृत्वाचे उदाहरण मांडतात. या वर्षी राज्य सरकारने 'लखपती दीदी' योजनेअंतर्गत ३७ लाख महिलांना जोडण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. स्टार्टअप आणि उद्योग क्षेत्रात महाराष्ट्राच्या महिला देशात पहिल्या क्रमांकावर आहेत याचा अभिमानही त्यांनी व्यक्त केला.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी नवनिर्वाचित महिला सरपंचांच्या प्रशिक्षणाला महत्त्व दिले आणि सुशासनासाठी प्रबोधिनीमध्ये महिला सरपंचांना प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याचे सांगितले.

प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सादर केली आणि ग्राम नेतृत्वाचे महत्त्व अधोरेखित केले. पद्मश्री पोपटराव पवार यांनी पाहुण्यांचे स्वागत केले, तर कार्यकारी संचालक अभिराम घड्याळपाटील यांनी आभार मानले.

याप्रसंगी मीरा-भाईंदरच्या महापौर डिंपल मेहता, आमदार नरेंद्र मेहता आणि शहरातील अनेक नगरसेवक उपस्थित होते. डिंपल मेहता म्हणाल्या की, अशा व्यासपीठांमुळे ग्रामीण महिलांच्या आत्मविश्वासाला नवी उंची मिळेल.

देशाच्या विविध राज्यांमधून सुमारे ५०० ग्रामीण महिला या परिषदेत सहभागी झाल्या आहेत, ज्यांनी व्यवसाय, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण काम केले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात यशस्वी महिलांचे अनुभव आणि विविध चर्चा सत्रे सादर केली जातील.

रेखाताई महाजन यांच्यासह अनेक नेत्या व्यासपीठावर उपस्थित होत्या.

## खापरखेड्यात 'आई जगदंबा सखी मंच'ने फुंकले महिला सक्षमीकरणाचे रणशिंग




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** जे हात पाळणा हलवतात तेच हात जगावर राज्य करतात या उक्तीचा जिवंत प्रत्यय नुकताच खापरखेडा येथे पाहायला मिळाला. आई जगदंबा सखी मंचच्या वतीने ८ मार्च रविवारला जागतिक महिला दिनानिमित्त एका प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा केवळ उत्सव न साजरा करता समाजाच्या शेवटच्या घटकातील कष्टकरी स्त्रीपासून ते उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपर्यंत त्यांच्या कर्तृत्वाला सलाम करणारा हा सोहळा उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आणि मनात अभिमान निर्माण करणारा ठरला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले माता सरस्वती, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून द्वीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी मंचावर प्रमुख पाहुण्या म्हणून माझी माहुली फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ.आयुषी आशिष देशमुख, भाजपा प्रदेश मंत्री अर्चना डेहनकर, औद्योगिक चिकित्सक डॉ. वर्षा पोतदार, उमेद अध्यक्षा सुषमा राऊत, ह जिल्हा भाजप महिला आघाडी अध्यक्षा उज्वला बोढारे, माजी जि.प.सदस्य छाया ढोले, प्रा. श्वेता रोकडे, भानेगाव ग्रा.पं.सरपंच शालिनी चवरे, रोहणा ग्रा.पं.माजी सरपंच उज्वला लांडे, मंजुश्री ठाकरे, नीता जालंदर आदी उपस्थित होत्या.

या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे समाजासाठी अहोरात्र झटणाऱ्या महिलांचा सन्मान घरकाम करणाऱ्या गंगाबाई उईके यांचा सन्मान झाला तेव्हा संपूर्ण सभागृह भारावून गेले होते. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. जयश्री पेटकर, पोलीस उपनिरीक्षक, प्रियंका पाटील, मुख्याध्यापिका विना पांडे, ॲड.भाग्यशाली अभ्यंकर, आशा वर्कर वैशालीताई बावणे, अंगणवाडी सेविका वर्तिका बागडे, सामाजिक कार्यकर्ता शोभाताई ढोके, ब्रह्मकुमारी संगीता दीदी, विजया कडू, पूनम दुबे, सीता शेडामे आदींना शाल श्रीफळ, स्मृती मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

महिलांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित स्पर्धांमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला नृत्य स्पर्धेत 'विठ्ठल विठ्ठल रुक्माई' नृत्याने मंत्रमुग्ध करणाऱ्या रुपाली कैकाडे यांनी प्रथम, तर हिना बागडे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. फॅशन शो स्पर्धेत राधिका मांगुळकर प्रथम तर अश्विनी पांडे यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला उखाणे स्पर्धेत प्रतिभा भड व राधिका मांगुळकर यांनी आकर्षक उखाणे सादर करून पारितोषिके जिंकली.

याप्रसंगी डॉ.आयुषी देशमुख यांनी माझी माऊली फाउंडेशन'च्या माध्यमातून ८० गावांत आरोग्य सेवा आणि मोफत एचपीव्ही लसीकरण देण्याचा संकल्प जाहीर केला. अर्चना डेहनकर यांनी स्त्रीने स्वतःला कधीही कमी लेखू नये कारण तीच देशाचा खरा विकास घडवू शकते असे भावनिक आवाहन केले. डॉ. वर्षा पोतदार यांनी स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव ठेवण्याचा सल्ला दिला तर उज्वला बोढारे यांनी सरकारी योजनांच्या माध्यमातून आत्मनिर्भर होण्याचे आवाहन केले.

